मा.अति.महा.आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :-१/६८
दिनांक :- ०७/०६/२०२०

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र. :- अतिमआ/साप्र/आस्था/१२८५
दिनांक :- ०७/०६/२०२०

- आ ज्ञा प त्र -

विषय :- लेखनिकी संवर्गातील ""अधिक्षक"" वर्ग-३ या संवर्गातील बढतीच्या तदर्थ नेमणूकीबाबत.

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र.१/४५, दिनांक १९/०५/२०२०
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र.१/६६ , दि.०७ /०६/२०२०.

पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे लेखनिकी संवर्गातील “उप अधिक्षक” वर्ग-३ या संवर्गातून “अधिक्षक” (वेतनश्रेणी ९,३०० ते ३४,८००+ ग्रेड पे ४,३००) या संवर्गात बढतीने नेमणूका करण्यात येतात. संदर्भ क्र.१ व २ चे मान्यतेस अनुसरुन खालील सेवकांची बढतीने तदर्थ नेमणूक करणेत येत आहे.

| अ. क्र. | सेवकाचे नाव व जातीचा गट | नेमणूकीचा गट | कोठून | कोठे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. जगताप विलास दादासाहेब (खुला) | खुला | पाणीपुरवठा विभाग | शिवाजीनगर घोलेरोड | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| २) | श्री. शिवले संजय सुभाषचंद्र (खुला) | खुला | परिमंडळ क्र. १ विभाग | कसबा विश्रामबागवाडा | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| ३) | श्रीमती बाचल मोहिनी हेमंत (खुला) | खुला | मुख्य लेखा व वित्त विभाग | मुख्य लेखा व वित्त | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| ४) | श्री. काळे भाऊसाहेब रंभाजी (इमाव) | खुला | वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय | मध्यवर्ती भंडार | शेड्युलमान्य रिक्त जागी |

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि. २८/१२/२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक

अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते, दिनांक २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सा.प्र.वि./का.१६-ब ने दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार सदर सेवकांची **अधिक्षक** पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहेः-

(अ) सदर अधिकाऱ्यांविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

(ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

२. वरील नियुक्त्या मे. राज्य शासनाच्यावतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, शासन निर्णय दिनांक २५/०५/२००४ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन करण्यात येत आहेत.

३. वरील सेवकांनी आज्ञापत्र हाच कार्यमुक्ती आदेश समजून संबंधित खात्यात त्वरीत रूजू व्हावे व तसे आस्थापना विभागाकडे कळविण्यात यावे.

४. संबंधित सेवकास मनपा सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

५. या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरुर ती पुढील कार्यवाही करावी.

Rubal 29/5/2020

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका.

प्रत - संबंधित खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका.
यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव . . . .